**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई**

"राज्य शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत."

**विभागाची आवश्यकता :-**

विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची अपुरी संख्या लक्षात घेता, विभागाचे कामकाज सुरळीतपणे व नियमितपणे व्हावे यासाठी प्रशासनाचा पुरेसा अनुभव असलेल्या **राज्य शासनाचा सेवेतून किमान "अवर सचिव" पदावरून सेवानिवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याची** अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे **करार पध्दतीने १ वर्षाकरीता** नियुक्ती करावयाची आहे.

**पात्रता व अनुभव :-**

१) कोणत्याही शाखेतील पदवीधर.

२) महाराष्ट्र शासनामध्ये गट -१ दर्जाचा अधिकारी व "लक्ष्यित सार्वजनिक वितरणव्यवस्थेचे संगणकीकरण" योजनेमध्ये किमान ५ वर्षांचा अनुभव.

**कामाची व्याप्ती खालील प्रमाणे असेल**

१) एनआयसी द्वारे विकसीत CAS व AePDS च्या अंमलबजावणी मध्ये सहकार्य करणे

२) लक्ष्यित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली, पुरवठा साखळी व्यवस्थापन व AePDS यासंबंधीत समस्यांचे निराकरण करणे

३) या प्रकल्पातील सर्व भागधारक म्हणजेच एनआयसी विभाग व संबंधीत क्षेत्रीय कार्यालये कंत्राटदार व इतर संबंधीत व्यक्ती या सर्वांमध्ये समन्वय ठेवणे.

४) संपुर्ण महाराष्ट्रतील रास्तभाव दुकानांमध्ये बसविण्यात आलेल्या ई पॉस मशीनद्वारे अनुज्ञेय लाभाचे संबंधीतांना वाटप करणे

५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे ॲप्लिकेशन्सकरिता आवश्यक माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधांमध्ये बदल करणे अथवा वाढविणे यासाठी सहाय्य करणे

६) उपलब्ध डाटाच्या आधारे माहिती व्यवस्थापन प्रणाली व डॅशबोर्ड तयार करणे

७) विभागाला आवश्यकता असल्यास, क्षेत्रीय मुल्यांकन / अंमलबजावणीची तपासणी करणे

८) शासन निर्णय, आदर्श कार्यपध्दती मार्गदर्शक सुचना यांचा मसुदा तयार करण्यामध्ये सहाय्य करणे

९) प्रकल्पाच्या प्रगतीचे मुल्यमापन करण्यासाठी वेळोवेळी बैठका घेणे, क्षेत्रभेटी करणे.

१०) अंमलबजावणी करते वेळी येणा-या अडचणी व समस्यांचे अवलोकन करुन त्यांच्या निराकरणाचे उपाय सुचवणे.

११) कंत्राटदारांच्या SLA चे पुनर्विलोकन करणे व व्यवस्थापनामध्ये विभागास सहाय्य करणे

**<u>कर्तव्य व जबाबदा-या</u>**

१) एनआयसी द्वारे विकसीत Centralized Application System (CAS)

२) डॅशबोर्ड व माहिती व्यवस्थापन प्रणाली तयार करणे

३) ई-पॉस मशीन आधारित Aadhar enabled public Distribution System (AePDS) ची अंमलबजावणी.

४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पायाभुत (Domain) ज्ञान.

५) माहिती तंत्रज्ञान संबंधीत पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन.

६) कामकाजाशी संबंधितांमध्ये समन्वय ठेवणे.

**<u>इतर अटी व शर्ती</u> :-**

१) सदर नियुक्ती केवळ १ वर्षाकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगली ज्ञान असावे.

४) उमेवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

७) उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक ०८.०६.२०१९ पर्यंत "अवर सचिव (नापु-११), दालन क्र.२१९, विस्तार इमारत, २ रा मजला, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल, अशारितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. यासंदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२७९३०५० या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यास अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, येथे काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे प्रधान सचिव (अनापुवग्रासंवि)/सह सचिव (नापु-११) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

-*-*-*-*-*-*-*-

# <u>अर्जाचा नमुना</u>

## <u>सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी वर्ग-१ यांची करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज</u>

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- ..............................................................

२) अर्जदाराचा पत्ता :- ..............................................................

..............................................................

..............................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- ..............................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ..............................................................

५) जन्म दिनांक व वय :- ..............................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय / नाही

७) अनुभव :- ..............................................................

..............................................................

"End to End Computerization of PDS" या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी